# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ'

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

गुरु नानक भवन, अंबाझरी वळणमार्ग, विद्यापीठ परिसर, नागपूर - ४४० ०३३ दूरध्वनी : २५३०८६०
ई-मेल : doll.rtmnu@gmail.com


प्रति,
मा. प्राचार्य
आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या
उपक्रमात सहभागी सर्व महाविद्यालये

क्र.आअविवि/१८२/१८
दिनांक : ०६/१०/२०१८

**विषय : आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या नवीन प्रकल्पांसंबंधी मार्गदर्शन सभेस उपस्थितीबाबत.**

महोदय,

आपल्या महाविद्यालयाद्वारे गेल्या अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे विविध उपक्रम तसेच माहिती संकलन प्रकल्प कार्यान्वित केले जात आहेत. नवीन विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने आता या उपक्रमांत व प्रकल्पांत काही महत्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. माहिती संकलन प्रकल्पालाही आता पूर्णविराम देण्यात आला आहे. त्याऐवजी 'उन्नती' हा नवा प्रकल्प लागू करण्यात येत आहे. त्याबरोबरच सहयोग, सक्षम आणि संस्कार हे प्रकल्पही लागू होत आहेत. अशा सर्व बदलांची उपक्रम व प्रकल्पश: माहिती देण्यासाठी वर्धा, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्हयातील आजीवन अध्ययन व विस्तार कार्यक्रमाच्या प्रभारी प्राध्यापकांच्या जिल्हाश: बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

**बैठकींचे वेळापत्रक :**

| जिल्हा | सभेचे ठिकाण | सभेची तारीख | सभेची वेळ |
|---|---|---|---|
| वर्धा | प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा | मंगळवार, ९ ऑक्टोबर, १८ | दुपारी १२ वाजता |
| गोंदिया | डि. बी. सायंन्स कॉलेज, गोंदिया | गुरुवार, ११ ऑक्टोबर , १८ | सकाळी ११ वाजता |
| भंडारा | जे. एम. पटेल कॅलेज, भंडारा | गुरुवार, ११ ऑक्टोबर , १८ | दुपारी ०३ वाजता |
| नागपूर | गुरुनानक भवन,विद्यापीठ परिसर, नागपूर | शनीवार, १३ ऑक्टोबर ,१८ | सकाळी ११ वाजता |

सभेला विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. सुभाष बेलसरे, प्राचार्य डॉ. के.एम.भांडारकर व प्रकल्प संयोजक डॉ. श्याम धोंड संबोधित करतील. या महत्वाच्या बैठकीला आपल्या महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार कार्यक्रमांच्या प्रभारी प्राध्यापकांची उपस्थिती अनिवार्य आहे. कारण, याच सभेत नवीन उपक्रमांचे माहिती पत्रक तसेच नवीन प्रकल्पांची मार्गदर्शक संहिता (Guideline) वितरित करण्यात येईल. आपणास विनंती आहे की, कृपया प्रभारी प्राध्यापकांना दोन विद्यार्थी प्रमुखांसह उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत. जेणेकरून नव्या प्रकल्पांच्या कार्यान्वयनासाठी ते लाभदायी ठरेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह,

आपला

डॉ. मोहन काशीकर
संचालक